■ Beed ■ DAILY ■ MARATHI ■ Year-03 ■ Issue -310 ■ SUNDAY DT.11 FEBRUARY 2024 ■ RNI-MAHMAR/2021/80074 ■ PRICE - 3 RUPEES ■ PAGES - 4

■ बीड ■ दैनिक ■ मराठी ■ वर्ष -०३ ■ अंक -३१० ■ रविवार,दि.११ फेब्रुवारी २०२४ ■ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ ■ । किंमत ३ रू ■ । पाने ४




दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




• बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

### समृद्धी महामार्गावर कारचा भीषण अपघात


# एअरबॅग उघडून फाटल्या, तिघांचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी बीड

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावरील अपघाताचं सत्र काही थांबण्याचं नाव घेत नाहीये. सलग दुसऱ्या दिवशी समृद्धी महामार्गावर कारचा भीषण अपघात झाला आहे. भरधाव वेगात असलेली कार अज्ञात वाहनांला धडकल्याने तिघांचा जागीच मृत्यू झाला. दुर्देवी बाब म्हणजे कारमधील एअरबॅग उघडून फाटल्या, पण कुणाचाही जीव वाचला नाही.

राहुल आनंद निकम (वय ४७), शिवाजी वामनराव थोरात (वय ५८) आणि अण्णा रामराव मालोदे (वय ७१) अशी मृतांची नावं आहेत. मृत व्यक्ती छत्रपती संभाजीनगरचे रहिवासी असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघाग्रस्त व्यक्ती छत्रपती संभाजीनगर येथून नाशिकच्या दिशेने जात होते. शनिवारी (१० फेब्रुवारी) रात्री ११ वाजेच्या सुमारास त्यांची कार दौलताबाद परिसरात आली. त्याचवेळी चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने कार थेट समोरून जात असलेल्या अज्ञात वाहनांना धडकली.



हा अपघात इतका भीषण होता, की कारचा अक्षरश: चक्काचूर झाला. अपघातावेळी कारच्या एअरबॅग उघडल्या. पण कुणाचाही जीव वाचला नाही. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलिसांसह रुग्णवाहिका तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतले असून शवविच्छेदनासाठी घाटी रुग्णालयात पाठवले आहेत.समृद्धी महामार्गावरील अपघातांची मालिका काही महिन्यांपासून खंडित झाली होती. मात्र, शुक्रवारी रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास महामार्गावर भीषण अपघात झाला होता. यामध्ये शिर्डीला दर्शनासाठी निघालेले ३ जण ठार झाले होते. शनिवारी (ता. १०) सलग दुसऱ्या दिवशी या महामार्गावर पुन्हा अपघात झाला. यामध्येही तिघांचा जागीच मृत्यू झाला.

# पोत्यामध्ये वर भाजीपाला, खाली सवा लाखाची दारु

प्रतिनिधी बीड



पोत्यात वरती भाजीपाला आणित्याखाली दारु भरुन वाहतूककरणाऱ्या एकाला बीड शहरपोलिसांनी शुक्रवारी रात्री ताब्यातघेतले. त्याच्याकडून तब्बल सव्वालाख रुपयांची दारु जप्त करण्यातआली. बीड शहरातून एक तरुणदुचाकीवरुन दारु वाहतूक करतअसल्याची माहिती बीड शहरपोलिसांना मिळाली होती.

एसपी नंदकुमार ठाकूर, एएसपी चेतनातिडके, डीवायएसपी विश्वांबर गोल्डेयांच्या मार्गदर्शनाखाली पीआयशितलकुमार बल्ला, एपीआयबाबासाहेब राठोड यांच्यासहबाबासाहेब सिरसाट, जयसिंह वायकर,सुशील पवार, अशपाक सय्यद, मनोजपरजणे यांनी सापळा रचून गणेश अश्रूबा येडे (३०, रा. चौसाळा ता.बीड) या तरुणाला ताब्यात घेतले.

तो दुचाकीवरुन जात होता. त्याच्याकडेचौकशी केली असता त्यानेसुरुवातीला आपण भाजीपालावाहतूक करत असल्याचे सांगितले.पोत्यात त्याने वरती भाजीपाला भरलामात्र तपासणी केली असता

### शहर पोलिसांची कारवाई, एकाविरोधात गुन्हा

पोत्यातखाली विविध कंपन्यांची सव्वा लाखरुपयांची दारु मिळून आली.या प्रकरणी गणेश येडे याच्या विरोधात शहरपोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला.

एलसीबीची आष्टीत कारवाई

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेच्यापथकाने आष्टी तालुक्यात सावरगावशिवारात अवैध दारु विक्रीविरोधातकारवाई केली. उद्धव सिरसाट (रा.गंगादेवी), दौलत मस्के (रा.सावरगाव), अर्जून मस्के (रा.सावरगाव) या तिन जणांना ताब्यातघेतले. त्यांच्याकडून २३ हजार ९००रुपयांची दारु जप्त केली.

### संतापजनक! नोकरीचे प्रलोभन दाखवून फॉर्महाऊसवर नेलं

# गुंगीचं औषध देत २० महिलांवर सामूहिक अत्याचार

प्रतिनिधी राजस्थान

अंगणवाडीत नोकरी लावून देण्याचं प्रलोभन दाखवून १५ ते २० विवाहित महिलांवर नराधमांनी सामूहिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. आरोपींनी पीडित महिलांना फॉर्महाऊसवर बोलावून घेतलं. त्यानंतर जेवणातून गुंगीचे औषध देत त्यांच्यावर आळीपाळीने बलात्कार केला. इतक्यावरच न थांबता संशयितांनी पीडित महिलांचे फोटो तसेच व्हिडीओ देखील काढले.

तळपायाची आग मस्तकात जाईल, अशी ही संतापजनक घटना राजस्थानच्या सिरोही जिल्ह्यात घडली. पोलिसांनी या प्रकरणात तक्रार दाखल करून घेण्यास विलंब केला होता. मात्र, महिलांनी कोर्टात धाव घेतल्यानंतर अखेर पोलिसांनी आतापर्यंत ८ संशयित आरोपींवर गुन्हे दाखल केले.

गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींमध्ये नगरपरिषदेचे सभापती आणि माजी आयुक्तांसहित ८ जणांचा समावेश आहे. दुसरीकडे तक्रारदार महिलांनी आपल्यावर खोटे आरोप केल्याचा दावा संशयित आरोपींनी केला आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला असून सध्या आरोपींना ताब्यात घेण्यात आलं आहे.

या घटनेनं परिसरातून संताप व्यक्त केला जात आहे. पीडित महिलांनी पोलिसांत दाखल केलेल्या तक्रारीनुसार, अंगणवाडीत नोकरीचे प्रलोभन दाखवून आरोपींनी महिलांना विश्वासात घेतलं. एकावेळी एका महिलेला फॉर्महाऊसवर भेटण्यासाठी बोलावून घेतले.

तिथे गेल्यानंतर आरोपींनी महिलेला जेवणातून गुंगीचे औषध दिले. त्यानंतर तिच्यावर सामूहिक अत्याचार केला. याबाबत कुणाकडे वाच्यता केल्यास व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यामुळे बदनामीपोटी महिलेने हा प्रकार कुणालाही सांगितला नाही.

मात्र, जवळपास १५ ते २० महिलांसोबत असा घृणास्पद प्रकार घडल्यानंतर या प्रकरणाला वाचा फुटली. महिलांनी एकमेकांना आधार देत आरोपींविरोधात पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी सुरुवातीला गुन्हा दाखल करण्यास विलंब केला. मात्र, कोर्टाने फटकारल्यानंतर आतापर्यंत ८ जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा नोंदवला. सध्या या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.नोकरी देतो म्हणून महिलांना बोलावून त्यांचे शोषण केले आणि त्यांना धमकावण्यातही आले. अंगणवाडीत नोकरी देण्याचे आश्वासन या महिलांना देण्यात आले होते. या घटनेत हायकोर्टने हस्तक्षेप केल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सभापती महेंद्र मेवाडा, आयुक्त महेंद्र चौधरीसहित आणखी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना शुल्कमाफी शक्य

# विद्यापीठाने मांडला ३०२ कोटींचा अर्थसंकल्प

प्रतिनिधी बीड

छत्रपती संभाजीनगर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली पहिलीच व्यवस्थापन परिषद पार पडली. या बैठकीत विषयपत्रिकेवरील ७५ विषयांवर सांगोपांग चर्चा करून निर्णय घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

यावेळी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी ३०२ कोटी रुपये खर्चाचा अर्थसंकल्प तयार केलेला आहे. या अर्थसंकल्पाविषयी सदस्यांना अवगत करण्यात आले. पुढील मान्यतेसाठी अधिसभा सदस्यांच्या बैठकीसमोर हा अर्थसंकल्प ठेवण्यात येईल, असेही सूत्रांनी सांगितले.

बैठकीदरम्यान विद्यापीठीय




शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय घेण्यासंदर्भात विषय मांडण्यात आला होता. त्यासंदर्भात बैठकीत दुष्काळग्रस्त तालुके आणि महसूल मंडळांमधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्कमाफीसंदर्भात दुष्काळग्रस्त गावांची यादी प्राप्त करून त्यावर चर्चा केल्यानंतर निर्णय घेण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

ग्रामीण समस्या संशोधन अध्यासन केंद्राला संत गाडगेबाबा यांचे नाव देण्याचा प्रस्ताव बैठकीदरम्यान मंजूर झाला. यासोबतच बैठकीदरम्यान अनेकांचे सातव्या आयोगाची वेतनवाढ, वैयक्तिक वेतनवाढ आदी विषय बैठकीत मांडण्यात आले असता, आर्थिक विषयातील समिती गठित करण्यात येऊन त्या समितीने सर्व संबंधितांना न्यायिक वाढ देण्यासंदर्भात ठराव झाला.

### मराठवाड्यात उद्यापासून हलक्या पावसाचा अंदाज

प्रतिनिधी परभणी

परभणी - प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार मराठवाड्यात शनिवारी (ता.१०) तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या स्वरूपाच्या तर रविवारी (ता.११) तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.पुढील पाच दिवसात कमाल तापमानात फारशी तफावत जाणवणार नाही. पुढील चार दिवसात किमान तापमानात हळूहळू २ ते ३ अंश सेल्सिअस ने वाढ होऊन त्यानंतर किमान तापमानात १ ते २ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता आहे. शनिवारी (ता.१०) जालना, परभणी, हिंगोली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ३० ते ४० कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.विस्तारित अंदाजानुसार (ईआरएफएस) मराठवाडयात ता. ९ ते १५ फेब्रुवारी दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त, कमाल तापमान व किमान तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी व ता. १६ ते २२ फेब्रुवारी दरम्यान पाऊस सरासरीएवढा, कमाल तापमान व किमान तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

# एक वर्षाच्या करारावर करुन घेतली चार वर्षे मजुरी

### ऊसतोड मुकादमा विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर उपोषण



प्रतिनिधी बीड

एक वर्षाचे करार करून चार वर्षे मजुरी करून घेणार्या सर्जेराव धोंडीबा डोईफोडे याच्या विरोधात तीन दिवसांपासुन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू आहे.

जया सुरेश लांडगे यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, राजकीय वलय असणारा ऊसतोड मुकादम सर्जेराव धोंडीबा डोईफोडे (रा.डोईफोडेवाडी ता.केज. जि.बीड) येथील रहिवाशी असुन एका वर्षाच्या करारावर चार वर्षे मजुरी करून घेणार्या मुकादमावर गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी तसेच तिन वर्षाच्या मजुरीची रक्कम अदा करण्यात यावी या मागणीसाठी तीन दिवसांपासुन जिल्हाधिकारी कार्यालयावर उपोषण सुरू आहे.

# अब्दुल सत्तारांच्या अडचणीत पुन्हा वाढ?

### सिल्लोडमध्ये एकाच वेळी ५ फौजदारी तक्रारी दाखल, नेमके काय आहे प्रकरण?



प्रतिनिधी सिल्लोड

**मंत्री अब्दुल सत्तारांविरोधात एकाच दिवशी पाच फौजदारी तक्रार दाखल करण्यात आल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. तसेच तक्रारदारांनी मागणी केली आहे की, पोलिस प्रशासनाने अगोदर प्राथमिक चौकशी करावी. तसेच आम्ही दिलेले सर्व पुरावे व प्राप्त पुरावा आधारे दोष सिद्धी अंती गुन्हा दाखल करावा. त्यामुळे आता पोलिसांकडून नेमकी काय कारवाई करण्यात येणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.**

मात्र, या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यास सत्तार यांची अडचण वाढू शकते. विशेष म्हणजे अब्दुल सत्तार यांच्यासह आणखी २५ जणांचा संशयित आरोपी म्हणून तक्रारीत उल्लेख करण्यात आला असून, ज्यात सत्तार यांचे पुत्र अब्दुल समीर अब्दुल सत्तार यांच्या नावाचा देखील उल्लेख आहे.

काय आहे प्रकरण?

पोलिसांत देण्यात आलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, अल्पसंख्यांक मंत्री अब्दुल सत्तार हे महाराष्ट्राचे कृषिमंत्री असताना सन २०२२ डिसेंबर महिन्यात सर्वे नंबर ९०, ९१ व ९२ मध्ये सिल्लोड कृषी महोत्सवासाठी नगरपरिषद सिल्लोड मार्फत जमिनीचे सपाटीकरण करण्याचे काम सुरू केले होते. ०१ ते ०७ जानेवारी २०२३ रोजी पर्यंत या जमिनीवर महाराष्ट्र सिल्लोड कृषी महोत्सव साजरा करण्यात आला होता.



संपादकीय

## दोन्ही स्वप्नांचा ताळा

आज जगावर दृष्टिक्षेप टाकला तर युरोपसहित अमेरिकेची अर्थव्यवस्था काहीशा धिम्या गतीने चालत आहेत. जपानसहित अनेक देशांनी गेल्या काही वर्षांमध्ये उणे विकासवाढ नोंदवली आहे. साऱ्या जगाच्या विकासाचे इंजिन समजल्या जाणाऱ्या चीनच्या अर्थवृद्धीचा वेगही बराच मंदावला आहे. अशा साऱ्या विपरीत परिस्थितीत आणि जगात अनेक ठिकाणी सशस्त्र संघर्षांना तोंड फुटले असताना भारताने इतका प्रचंड आत्मविश्वास का बाळगावा, असा प्रश्न स्वाभाविकच निर्माण होतो आहे.

ईीवसर्शी

यंदा निवडणुका असल्याने पूर्ण अर्थसंकल्प नसेल. नवीन सरकार येणार असल्याने तो 'अंतरिम' असेल. मात्र, या केंद्र सरकारला पुन्हा सत्तेवर येण्याचा आत्मविश्वास असेल तर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन एक फेब्रुवारीला काही दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या तरतुदीही करू शकतात. अर्थातच, त्या तरतुदी मतपेट्यांना विसरून होणार नाहीत. सामान्यपणे मध्यम व उच्च मध्यमवर्गाचे लक्ष असणाऱ्या प्राप्तिकर विषयक तरतुदी किंवा करसवलतीसाठी वाढीव गुंतवणुकीची मुभा या बाबी अर्थमंत्री विचारात घेतात का, हे लवकरच कळेल. हे अंतरिम बजेट अशा प्रकारे समाधानाचे ठरणार की नाही, हे कळेलच. मात्र, या बजेटच्या आधी भारताच्या आर्थिक विकासाचे जे चित्र आर्थिक पाहणीतून समोर येते आहे, ते व्यापक समाधान देणारे आहे, हे निश्चित. आजवर आपण पाच ट्रिलियन म्हणजे पाच लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न पाहात होतो. यंदाच्या आर्थिक पाहणीने आता हे स्वप्न सन २०३० मध्ये सात लाख कोटी डॉलर इतके उंच नेऊन ठेवले आहे. त्या आधी म्हणजे २०२७ मध्ये पाच लाख कोटी डॉलरचे स्वप्न पुरे झालेले असेल. हा प्रचंड मोठा आकडा गाठताना भारताची अर्थव्यवस्था दरवर्षी किमान सात टक्के दराने वाढत राहील, असेही या पाहणीत म्हटले आहे. एप्रिलमध्ये नवे आर्थिक वर्ष सुरू होईल. या २०२४-२५ या वर्षात आर्थिक वाढीचा दर ७.१ टक्के असेल आणि पुढील अनेक वर्षे सातत्याने हा वेग कमी-अधिक प्रमाणात कायम राहील, असे या पाहणीत म्हटले आहे. पुढील पाच ते सहा वर्षे सात टक्क्यांचा वेग गृहित धरणे म्हणजे विक्रमी वाटचालीचे स्वप्न आहे. इतका प्रचंड वेग सातत्याने चीन वगळता एकाही देशाला अलीकडच्या काळात साधता आलेला नाही. भारताने तसा तो गाठला आणि राखला तर अर्थातच आनंदाची बाब आहे आणि या अर्थवृद्धीच्या प्रमाणात रोजगार निर्मितीला चालना तसेच कल्याणकारी योजनांसाठी अधिक पैसा; ही दोन्ही उद्दिष्टे गाठता येतील.

आज जगावर दृष्टिक्षेप टाकला तर युरोपसहित अमेरिकेची अर्थव्यवस्था काहीशा धिम्या गतीने चालत आहेत. जपानसहित अनेक देशांनी गेल्या काही वर्षांमध्ये उणे विकासवाढ नोंदवली आहे. साऱ्या जगाच्या विकासाचे इंजिन समजल्या जाणाऱ्या चीनच्या अर्थवृद्धीचा वेगही बराच मंदावला आहे. अशा साऱ्या विपरीत परिस्थितीत आणि जगात अनेक ठिकाणी सशस्त्र संघर्षांना तोंड फुटले असताना भारताने इतका प्रचंड आत्मविश्वास का बाळगावा, असा प्रश्न स्वाभाविकच निर्माण होतो आहे. यावर या पाहणीतले आणि इतरही अनेक तज्ज्ञांनी आधीच सांगितलेले उत्तर म्हणजे भारतातली सातत्याने वाढत राहणारी देशांतर्गत मागणी, हे होय. भारतातील सतत वाढत राहणारा मध्यमवर्ग तसेच उच्च मध्यमवर्ग यांच्याकडून वाढत राहणारी मागणी, ही मागणी पुरविण्यासाठी उत्पादन तसेच सेवा उद्योगांना मिळणारी चालना आणि या साऱ्यातून जन्म घेणारे सुखचक्र.. असा हा अर्थतर्क आहे. तो बऱ्याच प्रमाणात वास्तव चित्रावर अवलंबून आहे. देशात बाहेरून येणारी तसेच देशांतर्गत होणारी गुंतवणूक, चलनवाढीवरचे नियंत्रण, देशातील कृषिक्षेत्राची कामगिरी आणि सेवाक्षेत्राला मिळालेला जबरदस्त वेग हे सारे निकष कायम राहिले तर हे सुखचक्र थांबणार किंवा मंदावणार नाही. मात्र, हे सारेच घटक आपल्या पूर्णपणे ताब्यात आहेत, असे समजणे योग्य होणार नाही.

भारतीय अर्थकारणातील अनुकूल बाबी पाहिल्या तर चलनवाढीवर बऱ्यापैकी नियंत्रण आहे. सरकार आणि रिझर्व्ह बँक यांना हे चित्र असेच राहील, असे वाटते. स्मार्ट फोन हे देशातील सर्वांच्या वापरातील साधन मानले तर पुढील अनेक वर्षे जगातील सर्वाधिक स्मार्ट फोन भारतात विकले जातील आणि कदाचित भारतात तयारही होतील, असे मानले जाते. स्मार्ट फोनची विक्री हे सुबत्तेचे एक लक्षण आहे. दुसरीकडे, वित्तसंस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या गृहकर्जांचे प्रमाण सातत्याने वाढत चालले आहे. गृहकर्जांची रक्कम नऊ लाख कोटी रुपयांच्या वर जाणे, हे सशक्त अर्थकारणाचे एक गमक आहे. याचे कारण, गृहबांधणी आणि वाहननिर्मिती हे दोन प्रमुख उद्योग हजारो उपउद्योगांना तर चालना देतातच पण रोजगाराची निर्मितीही झपाट्याने करतात.

# झी अवॉर्ड, फिल्मफेअर अवॉर्डच्या धर्तीवर रंगला बालझुंबड -२०२४ चा बक्षीस वितरण सोहळा

अंबाजोगाई (वार्ताहर)

अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने सलग २४ व्या वर्षी आयोजित बालझुंबड-२०२४ चा बक्षीस वितरण सोहळा आज शुक्रवार दि ०९ रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात संपन्न झाला . हा बक्षीस वितरण सोहळा वृत्त वाहिन्यांच्या फिल्मफेअर अवॉर्ड, झी अवॉर्ड सोहळ्याच्या धर्तीवरच संपन्न करण्यात आला. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते .या सोहळ्याची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रियदर्शनी क्रीडा मंडळाचे सचिव दिनकर जोशी यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी राजकिशोर मोदी यांनी अंबाजोगाई तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या या उपक्रमाला २४ वर्ष पूर्ण होऊन रौप्य महोत्सवी वर्षात आपण पदार्पण करत असल्याचे अभिमानाने सांगितले.अंबाजोगाई शहराची सांस्कृतिक परंपरा बालझुंबड या उपक्रमाद्वारे जोपासण्याचे काम हे मंडळ करत आल्याचे उल्लेखित केले. तसेच संस्कृती म्हणजेच अंबाजोगाई शहर अशी ओळख निर्माण झाल्याचे देखील याप्रसंगी दिनकर जोशी यांनी आवर्जून सांगितले. या स्पर्धेत इयत्ता १ली ते ४ थि, ५ वी ते ७ वी , तसेच ८ वी ते १० वी असे तीन गट तयार करण्यात आले होते.ज्यामध्ये पीपीटीस्पर्धेत ५ वी ते ७ वी या गटातून चि. रणवीर चंद्रकांत देशमुख,चि. शेख हसन खुर्शीद,छ संभाजीराजे ग्लोबल स्कुलच्या विद्यार्थ्यांने प्रथम क्रमांक मिळवला , त्याचबरोबर श्रीमती गोदावरी कुंकुलोळ शाळेच्या कु. समीक्षा गायकवाड व कु.गाथा मुळे या विद्यार्थ्यांनी द्वितीय तर पुन्हा छत्रपती संभाजीराजे ग्लोबल स्कुलच्याच कु. मोलीना चव्हाण या विद्यार्थिनीनी तृतीय क्रमांक मिळवत आपल्या शाळेस सन्मान मिळवून दिला.त्याचबरोबर इयत्ता इयत्ता ८ वी ते १० वी गटातून न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या कु सई अर्जुन पवार व कु. वांशिका रविंद्र अहिरे या विद्यार्थ्यांनी पहिला येण्याचा मान मिळवला. छत्रपती संभाजीराजे ग्लोबल स्कुलचे चि प्रणव धर्मराज जाधव आणि चि आरुष संतोष परदेशी या विद्यार्थ्यांनी दुसरा नंबर मिळवला तसेच खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे चि. तन्मय भैरुनाथ सातपुते, चि. कार्तिक राजेश गोरे या विद्यार्थ्यांनी तृतीय नंबर पटकावत आपल्या शाळेस बहुमान मिळवण्यासाठी प्रयत्न केला.क्विझ कॉम्पिटीशन स्पर्धेत इयत्ता ८ वी ते १० वी गटातून प्रथम क्रमांक चि. सार्थक वैजनाथ अंबाड , व्दितीय क्रमांक आनंद अमोल विभूते, तसेच तृतीय क्रमांक कु. मयुरी नवनाथ मोरे व चि. आदित्य अंगद देशमुख या विद्यार्थ्यांनी मिळवला. तर इयत्ता ५ वी ते ७ वी गटातून चि. ईशान राजेंद्र वडखेलकर, तर द्वितीय श्रेणीत चि.आराध्य गोपाळ गडदे, तर तृतीय क्रमांकासाठी चि. वरद विवेक देशमुख या विद्यार्थ्यांनी आपले नाव पटकावले .वैयक्तिक नृत्य स्पर्धेत इयत्ता १ ली ते ४ ठी गटातून न्यू व्हिजन पब्लिक स्कुलचा विद्यार्थी चि. वरद




महेश सूर्यवंशी याने पहिला क्रमांक पटकावला तर , कु. भाग्यश्री बाळू गिरी हीने द्वितीय क्रमांक पटकावला. त्याचबरोबर तृतीय क्रमांक खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाची कु. श्रीमयी शंकर शिनगारे या विद्यार्थिनीने आपल्या शाळेचे नाव कमावले. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत इयत्ता ५ वी ते ७ वी गटातून प्रथम क्रमांक चि. रणवीर चंद्रकांत देशमुख छत्रपती संभाजी राजे ग्लोबल स्कुल , द्वितीय संस्कृती संतोष घाडगे तर तृतीय क्रमांक अंशुल गिरीश बिडवे या विद्यार्थ्यांनी मिळवला. इयत्ता ८वी ते १०वी गटातून प्रथम क्रमांक कु. समृद्धी संजीव चाटे, देवयानी सुदर्शन देशमुख द्वितीय तर कु. राधिका गणेश चव्हाण या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक मिळवत आपले व आपल्या शाळेचे नाव उज्वल केले.रंगभरण स्पर्धेत १ ते ४ गटातून कु. श्रावणी दीपक फड,श्रेया श्रीनिवास शितोळे या विद्यार्थ्यांनी आपले व आपल्या शाळेचे नाव चमकवले. इयत्ता ५ वी ते ७ वी गटातुन कु. भूमी चंद्रकांत कोकाटे , ८वी ते १० वी या गटातून चि चैतन्य नितीन पवार या विद्यार्थ्यांनी बक्षीस संपादन केले . समूह नृत्य स्पर्धेत इयत्ता पहिली ते चौथी गटातून प्रथम क्रमांक प्रमोदजी महाजन इंग्लिश स्कुल , द्वितीय क्रमांक सृजन प्राथमिक विद्यालय, तर तृतीय क्रमांक घटनागनाथ प्राथमिक विद्यालय या शाळेतील मुलांच्या समूहाने मिळवला . ५ वी ते ७ वी या गटातून प्रथम क्रमांक प्रमोदजी महाजन इंग्लिश स्कुल , द्वितीय क्रमांक न्यू व्हिजन पब्लिक स्कुल, तृतीय क्रमांक स्वामी विवेकानंद बालविद्या मंदिर स्कुलच्या समूहाने समूह नृत्य स्पर्धेत आपल्या शाळेचे नाव उज्वल केले . मानवविकास मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या विशेष नृत्याचा विशेष गौरव करण्यात आला. तर इयत्ता ८ वी ते १० वी गटातून प्रथम क्रमांक प्रमोदजी महाजन इंग्लिश स्कुल, द्वितीय क्रमांक श्रीमती गोदावरीबाई कुंकुलोल योगेश्वरी नूतन कन्या शाळा, तृतीय क्रमांकासाठी वसंतराव काळे पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी आपले प्राविण्य दाखविले.या बक्षीस वितरण समारोहात राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हा अध्यक्ष ऍड राजेश्वर चव्हाण, विलास सोनवणे, सरपंच बाळासाहेब सोनवणे, किशोर परदेशी, तानाजी देशमुख, माजी नगरसेवक महादेव आदमाणे, अमोल लोमटे, संतोष शिनगारे, धम्मा सरवदे, गोविंद पोतंगले , खयामोद्दीन काझी, रोटरीचे स्वप्नील परदेशी, गणेश राऊत, मोईन शेख, इनव्हीलच्या सुनीता कात्रेला, श्रीमती खंडाळे रुपेश चव्हाण, सुधाकर टेकाळे , जेष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, प्रशांत बरदापुरकर, दत्ता आंबेकर, रवी मठपती, दिलीप आरसुळ, अभिजित लोमटे, राहुल देशपांडे यांच्यासह डॉ. राहुल धाकडे, डॉ. राजेश इंगोले, डॉ. अपर्णा कुलकर्णी , डॉ. बळीराम मुंडे, डॉ संदीप मोरे, डॉ जुबेर शेख, डॉ. विजय लाड, डॉ. ऐश्वर्या चव्हाण त्याचबरोबर अंबाजोगाई वकील संघाचे अध्यक्ष ऍड अशोक कवडे, ऍड कल्याणी विर्धे ,ऍड अनिल लोमटे, ऍड सुनील पन्हाळे , व्यापारी रामानुज मुंदडा, सुभाष बाहेती, धनराज सोळंकी, कांतीलाल चोकडा, तसेच शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार , पांडुरंग नरवडे, विष्णू सरवदे, दत्ता देवकते, साधू गायकवाड, यांच्यासह प्रतिष्टित नागरिक मकरंद कुलकर्णी,सुनील वाघाळकर, बाळासाहेब माने, गजानन औसेकर, योगेश कुलकर्णी , सय्येद ताहेर, अजीम जरगर आदीजण उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राजेश कांबळे यांनी केले. बालझुंबड - २०२४ संपन्न करण्यासाठी समनवयक राजेश कांबळे, मुख्याध्यापक चंद्रकांत गायकवाड, आनंद टाकळकर, विनायक मुंजे, सचिन जाधव, विजय रापतवार, विशाल जगताप आदींनी परिश्रम घेतले.यावेळी अंबाजोगाई तालुक्यातील विविध शाळांतील अनेक गुणवंत विद्यार्थी पालक ,शिक्षक व अन्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# केज येथे मुख्यमंत्री श्री. एकनाथराव शिंदे यांचा वाढदिवस विवीध उपक्रमांनी साजरा

केज (प्रतिनिधी)

महाराष्ट्राचे संवेदनशील मुख्यमंत्री श्री एकनाथराव शिंदे यांच्या वाढदिवसा निमित्त केज तालुका शिवसेनेच्या वतीने तांबवेश्वर मंदीर तांबवा येथे शिंदे साहेब यांना दिर्घ आयुष्य मिळावे यासाठी आरती करण्यात आली व केज उपजिल्हा रुग्णालय येथे रुग्णांना फळे केळी व बिस्किट वाटप करण्यात आले व बोबडेवाडी स्वामी समर्थ वृद्धाश्रम येथे फळे वाटप करण्यात आले. यावेळी उपजिल्हा रुग्णालय केजचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे शिवसेना तालुकाप्रमुख पंजाबराजे देशमुख, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे,महीला आघाडी तालुकाप्रमुख जयाताई राऊत,युवासेना तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते,शिवसेना शहर प्रमुख बालासाहेब पवार, ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ.बुडूक साहेब,अशोक जोगदंड, उपतालुकाप्रमुख चंद्रकांत इंगळे,महेंद्र चाटे,रामहरी कोल्हे,तालुका सचिव विकास काशिद,महीला आघाडी शहरप्रमुख सौ. वैशालीताई सांगळे,सुलभा राऊत,युवासेनाउपतालुका प्रमुख शिवाजी गायकवाड सर्कल प्रमुख प्रविण भांडवलकर,अन्सर शेख,पुरुषोत्तम गलांडे सह शिवसैनिक उपस्थित होते.

## दंत उपचार महाग नसतात आपल्या दुर्लक्षामुळे महाग पडतात

केज (प्रतिनिधी)

दंत उपचार महाग नसतात तर आपण करत असलेले दुर्लक्ष आपल्यालामहागात पाडत असते असे प्रतिपादन दंत शल्य चिकित्सक डॉ.रमणदळवी यांनी कर्मवीर विद्यालय चिंचोली माळी येथील दंत आरोग्य शिबिरात बोलताना केले.वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे यांच्या मार्गदर्शना खाली राष्ट्रीय मौखिक आरोग्य अभियान अंतर्गत कर्मवीर माध्यमिक विद्यालय चिंचोली माळी येथेजाऊन उपस्थित ३००पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची दंत,मौखिक आरोग्य तपासणी उप जिल्हा रुग्णालयाचे वरिष्ठ दंतचिकित्सक डॉ.रमण दळवी यांनी केली. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना दोन वेळेस ब्रश करण्याचे महत्त्व तसेच ब्रश करण्याची योग्य पद्धत देखील समजावून सांगितली. उपजिल्हा रुग्णालयाच्या समुपदेशक श्रीमती सीता गिरी यांनी मुलांना दैनंदिन आरोग्य व आहार याबद्दल सविस्तर मार्गदर्शनकेले.कार्यक्रमा च्या यशस्वी आयोजना साठी जिल्हा रुग्णालयाचे दंत सहाय्यक श्रीकांत उजगरे तसेच मुख्याध्यापक व शिक्षक यांनी सहकार्य केले.अशा प्रकारच्या शिबिरांच्या आयोजना मुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षक समाधान व्यक्त करत आहेत.

## क्रीडा भारती अंबाजोगाई ची कार्यकारिणी घोषित

अंबाजोगाई - क्रीडा भारती अंबाजोगाई तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून तालुका अध्यक्षपदी शैलेश कुलकर्णी तर मंत्रीपदी ज्ञानेश मातेकर यांची निवड करण्यात आली. क्रीडा भारतीचे देवगिरी प्रांत मंत्री भिकाजी बारसे यांच्या प्रमुख उपस्थितीत नुतन कार्यकारी निवडण्यात आली.त्यात तालुका अध्यक्षपदी शैलेश कुलकर्णी, तालुका मंत्री ज्ञानेश मातेकर,

उपाध्यक्ष सौ.मंदाकिनी गित्ते,प्रा.दिलीप कांबळे,सहमंत्री संजय वाकडे,योग प्रमुख प्रा.दिपक देवळे, सहप्रमुख उत्रेश्वर पांचाळ गुरुजी,युवा प्रतिनिधी बालाजी कराड,युवती प्रमुख कु.साक्षी थाटकर, क्रीडा केंद्र प्रमुख शारदा प्रसाद साहू सर, मनोज देशमुख सर,मातृशक्ती प्रमुख डॉ.रिता रामावत.तर जिल्हा योग सहप्रमुख प्राचार्य डॉ.दामोदर थोरात सर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

याप्रसंगी बोलतांना प्रांत मंत्री भिकाजी बारसे म्हणाले की, स्वदेशी खेळांच्या प्रसार होणे आवश्यक आहे.क्रीडा भारती च्या माध्यमातून शालेय व महाविद्यालयीन खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.मोबाईल व टि.व्ही च्या अती वापरामुळे तरुणाई मैदानापासून दुरावत चालली आहे.पालकांनी सुध्दा याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. जिल्हा मंत्री विनायक वझे म्हणाले की, आगामी काळात क्रीडा भारतीचे जिल्हा संमेलन होणार आहेत.



## व्यवसायात यशस्वी होण्यासाठी धैर्य,आत्मविश्वास आवश्यक - सौ.प्राजक्ताताई धस

आष्टी ।प्रतिनिधी

कुठलाही व्यवसाय सुरू करताना त्यामध्ये अनेक संकटाचा सामना करावा लागतो. सुरुवातीला कोणताच व्यवसाय झेप घेत नाही. जो व्यवसायामध्ये मेहनत, चिकाटी व सर्वांशी मिळून मिसळून वागतो त्याला व्यवसायामध्ये भरभराट नक्कीच होते. त्यासाठी व्यवसाय करताना धैर्य ,आत्मविश्वास आवश्यक असल्याचे प्रतिपादन महानंदाच्या संचालिका सौ.प्राजक्ताताई धस यांनी केले .

कडा येथे सागर ढोले व निशा ढोले यांच्या कलाश्री फोटो स्टुडिओचे उदघाटन सौ. प्राजक्ताताई धस यांच्या हस्ते गुरुवारी संपन्न झाले. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या .यावेळी व्यासपीठावर कडा गावच्या सरपंच लताबाई पाटील ,माजी सरपंच दीपा ढोबळे,सीमा कुलकर्णी, मधुरा कुलकर्णी, आदी मान्यवर उपस्थित होत्या. पुढे बोलताना सौ धस म्हणाल्या की, व्यवसाय करताना त्या व्यवसायाची आवड आपल्याला पाहिजे. शिवाय आपण जो व्यवसाय निवडणार आहोत त्यामध्ये मेहनत करण्याची तयारी पाहिजे.आजच्या युवकांनी नोकरीच्या मागे न धावता व्यवसायामध्ये उतरले पाहिजे. सागर ढोले यांनी संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये कुठेही नाही असा लहान मुलांचे फोटो शूट करण्याचा स्टुडिओ तयार केला आहे. या व्यवसायामध्ये त्यांच्या पत्नी निशा या सुद्धा त्यांना तेवढीच साथ देत आहेत. पती-पत्नी दोघेही फोटोग्राफी या कलाक्षेत्रातील व्यवसायात असल्याचा आष्टी तालुक्याच्या हा अभिमान आहे. लहान बाळाचे फोटो आपल्याला सदैव स्मरणात राहण्यासाठी या स्टुडिओ मध्ये खूप मोठी सजावट करण्यात आली असून बीड जिल्ह्यातही असा स्टुडिओ कुणीही उभारला नाही. अशाच प्रकारच्या नवनवीन व्यवसायात युवकांनी उतरले पाहिजे. युवकांनी यापुढे व्यवसायात उतरताना धैर्य आत्मविश्वास आवड व मेहनत करण्याची तयारी ठेवल्यास कोणताही व्यवसाय यशस्वी होतो असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी सीमा कुलकर्णी, मधुरा कुलकर्णी ,लताबाई भीमराव पाटील ,दीपा ढोबळे यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी कडा व परिसरातील महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती .कार्यक्रमाचे प्रस्ताविक कवी दिलीप उढाने यांनी केले.

# 'बोगस शिक्षक भरती' प्रकरणी चौकशीत सर्वांचीच उडाली भंबेरी

## मुख्याध्यापक, शिक्षक व संस्थाचालक अनेकदा ठरले निरुत्तर !

परभणी

त्र्येचाळीस शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बोगस व नियमबाह्य भरती संदर्भात नियुक्त पाच सदस्यीय समितीद्वारा चौकशीत शिक्षक, मुख्याध्यापक व संस्थाचालकांवर विविध प्रश्नांचा भडीमार केल्याने त्या सर्वांचीच पूरती भंबेरी उडाली गेली. परिणामी वारंवार निरुत्तर झालेल्या गैरप्रकारात लिप्त निलंबित शिक्षणाधिकारी भुसारेंच्या विठ्ठलाचे कृष्णकृत्य लवकरच चव्हाट्यावर येणार, ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे.

सेलू येथील नामांकित तथा बहुचर्चित नूतन विद्यालय शिक्षण संस्थेअंतर्गत नूतन विद्यालय व श्रीमती ल.ला.रा.नूतन कन्या शाळा या शैक्षणिक संस्थांमध्ये तत्कालीन शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे व अन्य काही कर्मचारी यांनी संस्था चालकांशी संगनमत व कथित आर्थिक उलाढाल करीत ४३ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बोगस आणि गैरमार्गाने भरती केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्याच अनुषंगाने मागील ७ व ८ फेब्रुवारी असे दोन दिवस जी कसून चौकशी करण्यात आली, त्यातून बराच मोठा आर्थिक घोटाळा पुढे येऊ शकेल, अशी भयानक चर्चा सर्वत्र चर्विली जात आहे. संपूर्ण शिक्षण क्षेत्रात याविषयी प्रचंड खळबळ माजली असून अनेक दिग्गज या घोटाळ्याकडे नजरा लावून बसले आहेत.

करोडोंच्या या घोटाळ्या विरोधात सजग प्रहरी असलेल्या काही माध्यमांनी सामाजिक बांधिलकी जपत आवाज उठविला आहे. पँथर सेनेचे शहराध्यक्ष किरण यशवंत लोखंडे यांनी सुध्दा या घोटाळ्यासंबंधी प्रखर टिका करत उपोषणाचे हत्यारही उपसले होते. माध्यमांचा टाहो आणि लोखंडे यांच्या उपोषणाची छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय शिक्षण उपसंचालकांनी दखल घेतली. त्याचाच परिपाक म्हणून सहसंचालक रवींद्र वाणी यांच्या अध्यक्षतेखाली व सचिव तथा योजनेचे शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांच्यासह पाच सदस्यीय समिती



### निलंबित शिक्षणाधिकारी भुसारेंच्या विठ्ठलाचे कृष्णकृत्ये येणार चव्हाट्यावर

गठीत केली होती. त्याच अनुषंगाने डेरेदाखल झालेल्या उच्चस्तरीय समितीने ७ व ८ या दोन दिवसात कसून चौकशी केली. त्यात करण्यात आलेल्या भरतीला अनुसरुन जी जी आवश्यक आहेत, ती विविध प्रकारची मूळ कागदपत्रे आणि पुरावे चौकशी समितीने मागितले असता शाळा व संस्थेने ते सर्व देण्यास असमर्थतता दाखविल्याचे पुढे आले.आश्चर्याची बाब म्हणजे चौकशी समितीने केलेला प्रश्नांचा भडीमार सर्वांना हतबल करणारा ठरला. ज्यामुळे गैरमार्गात लिप्त मुख्याध्यापक, बोगस भरतीमधले शिक्षक व संस्थाचालक अनेकदा निरुत्तर झाल्याची चर्चा पसरली असल्यामुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जातो आहे.

बोगसपणे झालेल्या शिक्षक भरतीप्रकरणीची किंवा त्या संबंधित जी आवश्यक आहेत, अशी कोणतीही कागदपत्रे व संचयिका कार्यालयात उपलब्ध नसल्याचे, (तथा ती गायब केल्याचे ?) जि.प.माध्यमिक शिक्षण विभागाने लेखी उत्तरात कळविले होते, तर भरती केलेल्या शिक्षका संदर्भात वैयक्तिक मान्यता अथवा नियुक्ती आदेश शाळेच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे श्रीमती ल.ला.रा.नूतन कन्या शाळेच्या मुख्याध्यापकांने माहिती अधिकारात लेखी स्वरुपात कळविले होते. तद्वतच ४३ शिक्षक पद भरती संदर्भात कुठलीही कागदपत्रे कथवा संचयिका उपलब्ध नसतानाही झालेल्या चौकशीत समितीला नेमके काय मिळाले, किंवा कोणत्या स्वरूपात चौकशी केली, या व अशा संशयातीत बाबी अहवाल प्राप्तीनंतरच समजून येतील, भुसारेंच्या विठ्ठलाकडून घटीत कृष्णलीलाही पुढे येतील एवढे मात्र खरे..! तो पर्यंत तरी ज्यांच्यावर आरोप ठेवले आहेत.

दैनिक
मराठवाडा पत्र



# वीटभट्टी क्लस्टरमुळे लाखोंचा होणार फायदा परळीत राखेच्या तुटवड्याचा प्रश्न कायम

परळी वैजनाथ : शहर व परिसरात मोठ्या प्रमाणावर वीटभट्ट्या असून दोन वर्षांपासून येथील औष्णिक विद्युत केंद्रातील राखेच्या कमतरतेमुळे काही वीटभट्ट्या बंद पडल्या आहेत. तर आणखीनही मोठ्या संख्येने वीटभट्ट्या सुरू असल्याचे दिसून येत आहे. नुकतेच उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार वीटभट्टी व रेशीम क्लस्टरला तत्त्वतः मान्यता दिली आहे. यामुळे शहर व परिसरातील वीटभट्ट्या, येथील कार्यरत हजारो मजूर आणि त्यांच्यावर विसंबून असलेल्या बाजारपेठेला याचा फायदा होईल, अशी अपेक्षा आहे.

येथील औष्णिक वीजनिर्मिती केंद्रामध्ये हजारो टन राख तयार होते. सुरवातीला या राखेचे काय करायचे, हा प्रश्न निर्माण झाला होता. ही राख अगोदर तळ्यात पाण्याद्वारे सोडली जात असे. तळ्यातील पाणी संपल्यानंतर हवेतील प्रदूषणात वाढ होवू लागली. हवेतील प्रदूषण कमी करण्यासाठी विद्युत निर्मिती केंद्राच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. राखेचा वापर सिमेंट निर्मितीसाठी होवू लागला.

या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातून राख टँकरद्वारे वाहून नेली जात असे. तर औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राकडून वीटभट्टीसाठी मातीसोबत काही प्रमाणात राखेचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. व राख वीटभट्टीसाठी मोफत देण्यात आली. यामुळे राखेचा वापर वीटभट्ट्यांसाठी होवू लागला.

# माझ्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न

## मनोज जरांगेंचा मोठा गौप्यस्फोट, संपूर्ण थरारच सांगितला

नाशिक दौऱ्यावर असताना माझ्यासोबत घातपाताचा प्रकार करण्याचा प्रयत्न झाला. तसेच अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्नही करण्यात आला, पण सुदैवाने आम्ही वाचलो, असं जरांगे यांनी सांगितलं आहे.

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी एक मोठा गौप्यस्फोट केला आहे. नाशिक दौऱ्यावर असताना माझ्यासोबत घातपाताचा प्रकार करण्याचा प्रयत्न झाला. तसेच अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्नही करण्यात आला, पण सुदैवाने आम्ही वाचलो, असं जरांगे यांनी सांगितलं आहे. अंतरवाली सराटी येथे घेतलेल्या पत्रकारपरिषदेत ते बोलत



होते. राज्य सरकारने सगेसोयरे अध्यादेशाचे तातडीने कायद्यात रुपांतर करावे, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे शनिवारपासून (१० फेब्रुवारी) पुन्हा आमरण उपोषण सुरू केलं. उपोषणाला बसण्याआधी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

# दिव्यातील रेशनिंग दुकानदाराचा ग्राहकांच्या जीवाशी खेळ

## उंदराची विष्ठा व ड्रेनेज पाणी मिश्रित धान्य ; भाजपच्या सपना भगत आक्रमक

अमित जाधव।प्रतिनिधी

दिव्यातील मुंब्रादेवी कॉलनी येथील दुकान क्र ४८ फ १०८ या स्वस्त धान्याच्या रेशनिंग दुकानाचा दिवा भाजप महिला मोर्चा अध्यक्षा सपना रोशन भगत यांनी भांडाफोड केला आहे. सदर दुकानात उंदराची विष्ठाअसलेले व ड्रेनेजचे पाणी मिश्रित धान्य धान्य वाटप करताना आढळून आल्याने दिव्यातील अनेक महिलांनी दिवा भाजप महिला मोर्चाच्या सपना भगत यांच्याकडे तक्रारी केल्याने सदर दुकानावर अनेक महिला दुकानावर धडकल्या व दुकान दारास धारेवर धरले. आपल्या सोयीप्रमाणे दुकान उघडण्याचे मनमानी धोरण राबवले जात असल्याने पहाटे चार वाजल्यापासून लाईन लावावी लागते तर तुम्ही वेळेत आले नाही म्हणून धान्य परत गेले अशी उत्तरेही देऊन ग्राहकांना माघारी पाठवले जाते. रेशनिंग कार्डात नाव वाढले असताना देखील जादा धान्य दिले जात नाही. शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे



नागरिकांच्या सुविधेसाठी शहरातील स्वस्त धान्य दुकाने सकाळी चार तास दुपारनंतर चार तास व ज्या ठिकाणी आठवडे बाजार असतो तेथे पूर्णवेळ दुकाने खुली ठेवून लाभार्थ्यांना धान्याचे वितरण करण्याचा नियम असताना कोणत्याही कारवाईची भीती न बाळगता सवडीनुसार दुकाने सुरू ठेवत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी भाजप कार्यालयात दिल्या आहेत. संबंधित तक्रार प्रशासनास देऊन कडक कारवाई करण्याठी सपना भगत आक्रमक पाऊल उचलणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

धान्य वेळेवर न मिळणे, दुकानाची वेळ निश्चित करणे, पुरेसा धान्याचा साठा, धान्याचा दर्जा व स्वच्छता, घाणीचे साम्राज्य, प्रभागातील लाभार्थ्यांना अपुरा धान्य वाटप प्रकरणी पुरवठा विभागाने संबंधित दुकानावर कडक कारवाई करण्याठी दिवा भाजप महिला मोर्चा अध्यक्षा सपना रोशन भगत आक्रमक पाऊल उचलणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

## माना कि अंधेरा बहोत घना हैं ।

# लेकिन दिया जलाने को कहा मना हैं।। - विजयाताई मारोतकर

अंबाजोगाई :- येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात रोजी विद्यार्थिनींसाठी व महिला पालकांसाठी समुपदेशन उपक्रम घेण्यात आला.या समुपदेशनाचा विषय 'पोरी जरा जपून..'या विषयावर विषय मांडणी मा. विजयाताई मारोतकर यांनी केली.प्रथम मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी अध्यक्षा म्हणून शालेय समिती सदस्या नभा वालवडकर,

सीबीएससीच्या प्राचार्या प्रतिभा शिंदे ह्या होत्या.त्यानंतर मान्यवरांनी मुलींशी संवाद साधत असताना त्यांना म्हणाल्या की, मुली आज चुल आणि याच्यापुढे जाऊन गगन भरारी घेत आहेत.पण आधुनिक तंत्रज्ञानाच्या या युगात टीव्ही, मोबाईल



,संगणक यांच्यापासून होणारे दुष्परिणाम त्यांनी सांगितले.आपले कुटुंब आज विभक्त होत आहे.आजी आजोबा नसल्याने कुटुंबातील संवाद कमी होत आहे. त्यामुळे मुली आज एकट्या पडत आहेत.आई-वडिलांकडे वेळ नसल्यामुळे त्याचा गैरफायदा समाजातील वाईट लोकांच्या नजरा आज आपल्या मुलींवर पडत आहेत.आपल्या आयुष्यात तील तीन 'प' महत्त्वाचे आहेत.१) पिता २) पती ३) पुत्र हेच आपली खरी काळजी घेतात.

आजचा हा त्यांचा ३९४ वा कार्यक्रम खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात होता. त्यांनी स्वामी विवेकानंदांनी सांगितल्याप्रमाणे ुरींलह वर ुरींलह ठेवा तिरंग्याच्या तीन रंगाप्रमाणे आपली आहार पद्धतीचे पालन करणे,१०९१, १०९८ या मोबाईल नंबर वर निर्भया, पथक दामिनी पथक आपल्या मदतीच्या वेळी आपल्याला उपयुक्त ठरेल असे सांगितले.स्वतःचे रक्षण स्वतःच केले पाहिजे कार्यक्रमाच्या शेवटी त्यांनी स्वतः लेखन केलेले पुस्तक पोरी जरा जपून,कवेत अंबर घेताना हे दोन पुस्तक विद्यार्थिनींना भेट देऊन सर्व मुलींकडून प्रतिज्ञा म्हणून घेतली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मी घुगे,स्वागत व परीचय कल्पना जवळगांवकर,प्रास्ताविक जयश्री इटकुरकर यांनी केले.तर आभार प्रदर्शन सुरेखा काळे यांनी केले.कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. कल्याण मंत्र शिल्पा सेलुकर यांनी घेतला. समुपदेशन उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे, मुख्याध्यापक तथा केंद्रीय कार्यकारणी सदस्य बाबुराव आडे,उपमुख्याध्यापक अरूण पत्की,पर्यवेक्षक सूर्यकांत उजगरे,प्रशांत पिंपळे,जयश्री इटकुरकर व सर्व महिला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# राष्ट्रवादी युवा जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब बांगर यांनी घेतला आनंदोत्सव मेळावा

पाटोदा । प्रतिनिधी

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षबांधणी करण्यासह कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी पाटोद्यात आज शुक्रवार (दि.९) रोजी राष्ट्रवादी युवक आनंदोत्सव मेळावा व भव्य रॅलीचे आयोजन राष्ट्रवादी युवक चे बीड जिल्हाध्यक्ष विजयसिंह (बाळा) बागर यांनी आयोजीत केला होता या मेळाव्यास मोठ्या संख्येने युवा वर्ग यावेळी उपस्थित होता राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष विजयसिंह उर्फ बाळा बांगर यांनी पाटोद्यात राष्ट्रवादीच्या वतीने 'राष्ट्रवादी युवक आनंदोत्सव मेळावा' व भव्य रॅली चे आयोजन करण्यात आले होते यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगर पंचायत कार्यालयापर्यंत ही रॅली काढण्यात आली तर ठीक सायंकाळी आठ वाजता नगर पंचायत समोर युवक आनंदोत्सव मेळावा घेण्यात आला.या मेळाव्याला राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती दरम्यान यात अधिकाधिक संख्येने युवा कार्यकर्ते सहभागी झाले होते यावेळी बोलताना बाळासाहेब बांगर म्हणाले की राष्ट्रवादी पक्ष हा फुले शाहु आंबेडकर यांच्या विचारांवर चालणार पक्ष आहे हा पक्ष माननिय आजित दादा पवार यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे करीता हा आनंदोत्सव सजरा करण्यात येत आहे.



पाटोदा तालुका हा शहीदांचा तालुका आहे, पाटोदा तालुका हा गोरगरीब लोकांचा तालुका आहे यावेळी बोलताना कोव्हीड युद्ध बाळासाहेब बांगर म्हणाले की माझे राजकारण संपविण्याचा प्रयत्न केला गेला आसे ते या मेळाव्यात बोलताना म्हणाले पाटोदा भुमी ही क्रांतिकारक चा तालुका आहे कोव्हीड काळत काम केल्यामुळे मला आत्ता पर्यंत त्याचा त्रास होत आहे बाळ बांगर हा सैदव कार्यक्रतच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे चांगले काम करताना मरण जरी आले तरी आले बेहतर पण जनतेच्या सेवेत सदैव उभा राहिला मला कोणत्याही राजकीय अपेक्षा नाहीत चळवळ ही वढली गेली पाहिजे मार्केट कमिटीच्या निवडणुकीत मधे आमचा प्रेमाने घात झाला, पाटोदा पोलीस मित्र म्हणून सदैव पोलीस च्या पाठीशी उभे राहिले आष्टी पाटोदा शिरूर येथे गुत्तेदारी व्यवस्था निर्माण झाली आहे तालुका घडवायचा असेल तर चळवळ जिवंत राहील पाहिजे आसे यावेळी बाळासाहेब बांगर यांनी सांगितले या आंनदोत्सव मेळाव्यास सहकार महर्षी रामकृष्ण बांगर ,कल्याण आखाडे सावता परीषद अध्यक्ष, सतिश शिंदे ,नारायण येवले, श्रीहारी काका पवार,ऊमेश पोखरकर,रोहणजी गायकवाड, सचिन जाधव राष्ट्रवादी बीड जिल्हा उपाध्यक्ष, विनोद पवार शिरूर,शहर अध्यक्ष,आक्षय जाधव तालुका अध्यक्ष शिरूर, इत्यादी कार्याकर्ता उपस्थित होते

# जालना पोलिसांनी व माणुसकी समुहाने दिला ३० वर्षीय मनोरुग्ण महिलेला दिला न्याय दिव्य सेवा प्रकल्प बुलढाणा येथे पुनर्वसनासाठी केले दाखल

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

आपल्या घरातील स्त्री बाहेर गेली आणि घरी परत यायला तिला उशिर झाला की जीव कासाविस होतो.रात्री अपरात्री काही झालं तर? मात्र ती घरात सुखरूप आल्या नंतर आपली काळजी संपते.घरातल्या चार भिंतींच्या मर्यादेत ती सुरक्षित असते.पण अशाच असुरक्षित व धोक्याच्या कित्येक स्त्रिया रात्री भटकत असतात;ती कुणाची तरी आई, मुलगी,अथवा पत्नी, किंवा बहीण असेल.पण त्यांची वाट पाहणारं असं कुणीच नाही.अशा अनेक महिला ज्यांना त्यांच्या आपल्या लोकांनीच व समाजाने देखील सोडून दिलं आहे.कारण त्या आजारी आहेत मनोविकृत आहेत.ता.जालना पोलीस स्टेशन हद्दीत जालना शहरात गेल्या अनेक दिवसांपासून मानसिक आजाराने ग्रस्त एक महिला फिरत असून,येनाऱ्या जानाऱ्या वाहनांना व लोकांना दगड मारने,रोडवर जोरदार ओरडुन दहशत नीर्मान करत होती दुकानदारांचे देखील नुकसान करित होती हातात मोठि काठी घेवुन ती रात्री बेरात्री आपले स्वतः चे डोके जमीनिवर जोरजोरात मारने परीस्थिती एवढि

## सु-लक्ष्मी बहुद्देशिय सेवाभावी संस्थेतर्फे मदतकार्य

### माणुसकी समुहाचे कार्य मनोरुग्णानसाठि लाख मोलाचे

मनोरुग्णांच्या जवळ देखील कोणी जायला तयार होत नाही ते खूप सेन्सिटिव्ह असतात कोणत्याही क्षणी काहीही करू शकतात परंतु समाजसेवक सुमित पंडित करत असलेल्या रंजल्या गांजल्यांच्या सेवा ही खरंच वाखाडणे योग्य आहे.मनोरुग्णानसाठि ते स्वतः दाढी कटिंग व स्वच्छ अघोळ घालुन त्यांना माणसात आणतात व त्यांना हक्काचा निवारा मिळवून देतात आज प्रत्यक्ष मी माझ्या डोळ्यांनी त्यांना या मनोरुग्ण महिलेला कोणी जवळही जाण्याची हिंमत करत नव्हते त्याप्रसंगी समाजसेवक सुमित पंडित यांनी मोठे हिमतीने त्या महिलेला हक्काचा निवारा मिळवून दिला आहे त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार समाजात अशी खूप कमी लोक आहेत की ते दुसऱ्यासाठी जगतात.

- एम.टि.सुरवसे पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन ता.जालना



भयानक होती की काही माणुसकी हिन लोक रात्रीच्या वेळी तीच्या मागे मागे देखील फिरायचे ह्या मानसिक अवस्थेत आहेत.हि बाब पोलीस निरिक्षक एम.टि.सुरवसे यांच्या लक्षात आली असता.त्यानी त्या मनोरुग्ण महिलेची चौकशी केली. ती मुंबई तर कधी नागपूर येथील असल्याचे सांगते हि एक बेवारस निराधार महिला आहे हे त्यांच्या लक्षात आले.पुनर्वसनासाठी काही समाजिक संस्थेचे स्वयंसेवक काम करते का त्यात पो.नि.एम.टि.सुरवसे यांनी सु-लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि माणुसकी रुग्ण समूहाचे सामाजसेवक श्री सुमित पंडित यांना माहिती दिली,असता सुमित पंडित यांनी विविध आश्रमांची विचारपूस केली,असता बुलढाणा जील्हातील वरवंड येथील दिव्या फाँडेशन चे श्री.अशोक काकडे यांच्याशी फोन द्वारे संपर्क करुन त्या महिलेला पुनर्वसना साठि मनोरुग्ण सेंटर येथे नेण्याचे ठरवले,कारण असे कळले आहे की दुर्दैवाने संभाजीनगर जील्हात येथे अश्या मनोरुग्ण महिलांसाठी पुनर्वसनाची काहीच व्यवस्था नाही.

# माजलगाव परिसर चा सहकार रत्न पुरस्कार अंकुश शिंदे यांना जाहीर

माजलगाव : प्रतिनिधी

येथील साप्ताहिक माजलगाव परिसर च्या वतीने देण्यात येणारा कै. देविदासराव कुलकर्णी स्मृती सहकार रत्न पुरस्कार २०२४ माजलगाव येथील सावली अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे चेअरमन अंकुश शिंदे यांना जाहीर करण्यात आला असल्याची माहिती या वृत्तपत्राच्या वतीने सौ आनंदी कुलकर्णी यांनी दिली आहे.

या बाबत माजलगाव परिसर च्या वतीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात त्या म्हणतात संस्थापक संपादक प्रदीप कुलकर्णी यांचे वडील कै. देविदासराव कुलकर्णी यांचे सहकार क्षेत्रात खूप मोठे योगदान होते. आणि त्यांच्या स्मृतीला उजाळा म्हणून त्यांच्या स्मरणार्थ कै. देविदासराव कुलकर्णी स्मृती सहकार रत्न पुरस्कार दिला जातो. सहकारामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आणि माजलगाव परिसराला नेहमी सहकार्य करणाऱ्या सहकार क्षेत्रातील मान्यवरांना या पुरस्काराने प्रतिवर्षी सन्मानित करण्यात येते. कै. देविदास राव कुलकर्णी यांच्या बाराव्या पुण्यस्मरणानिमित्त दिला जाणारा २०२४ चा हा पुरस्कार अंकुश सूर्यभानराव शिंदे यांना जाहीर करण्यात आला असून या पुरस्काराचे वितरण माजलगाव परिसर या साप्ताहिक वृत्तपत्राच्या वर्धापन दिनी दिनांक ४ मार्च २०२४ रोजी मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे ही सौ आनंदी कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना सांगितले.



साप्ताहिक माजलगाव परिसर आपली ३७ वर्षाची यशस्वी कारकीर्द पूर्ण करून ३८ व्या वर्षात पदार्पण करत आहे, याचे औचित्य साधून विविध पुरस्कार वितरित करण्यात येतात. लवकरच गुणवंत साहित्यिक पुरस्कार आणि उत्कृष्ट वाचक पुरस्कार यांची ही घोषणा करण्यात येणार असल्याचे आनंदी कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष

## ॲड. अनिल डाळ्या यांच्याकडून जिल्हा पोस्ट अधिकारी धारेवर

इचलकरंजी / प्रतिनिधी

संजय गांधी निराधार योजना समितीचे एकूण ८ हजार लाभार्थ्यांचे खाते पोस्टात आहे, त्यापैकी ७५६ लोकांचे पैसे खात्यामध्ये पोस्टमन लोकांनी अकाउंट काढताना स्पेलिंग व अकाउंट नंबर मध्ये अनेक चुका केल्यात, त्या चुकीचा भुईंड लाभार्थ्यांना होत आहे. एकीकडे नोव्हेंबर पर्यंतचे पैसे १६ हजार लाभार्थी जे के. डी.सी. बँकेत आहेत, त्यांना ती रक्कम मिळाली आहे. पण पोस्टातील लाभार्थींना रक्कम का दिली नाही तसेच एक महिन्यापूर्वी पोस्टातील ८ हजार लाभार्थ्यांचा डाटा पोस्टातील अधिकारी यांनी जिल्हा पोस्ट अधिकारी यांना दिला होता, जेणेकरून त्यांनी लाभार्थ्यांचे पैसे त्यांच्या खात्यामध्ये जमा व्हावे यासाठी तो डाटा चेक करून त्यांनी परत संजय गांधी समितीकडे पाठवणे आवश्यक होते, परंतु ते त्यांनी पाठवले नसल्यामुळे संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष अनिल डाळ्या व तहसीलदार मनोज येतवडे यांनी कोल्हापूर जिल्हा पोस्ट अधिकारी, संतोष सिंग यांची चांगलीच कान उघडणी केली तेव्हा महिना अखेर पर्यंत सर्व यादी दुरुस्त करून पाठवतो व ७५६ लोकांचे देखील पैसे दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत स्पेलिंग मिस्टेक व नंबर दुरुस्त करून लाभाथ्यर्थ्यांच्या खात्यावर पाठवतो, असे समितीला आश्वासन दिले आहे अशी माहिती अनिल डाळ्या यांनी पत्रकार परिषदेत दिली

के.डी.सी. बँकेत हयातीचा दाखला घेतला जातो. परंतु पोस्टात हयातीचा दाखला न घेतल्यामुळे ते पैसे मयत झालेल्या व्यक्तीच्या खात्यावर जमा होते. व नंतर मोबाईलच्या ओटीपी द्वारे ते पैसे लाभार्थ्यांचे अनेक नातेवाईक किवा एजेंट ते पैसे काढून घेतात. परंतु केडीसी बँकेत ओटीपी नसल्यामुळे ते काढता येत नाही. पोस्टात लाभार्थ्यांना पासबुक दिले जात नाही. लाभार्थी वयस्कर, निराधार व अशिक्षित असल्यामुळे किती पैसे जमा झाले व ओटीपी द्वारे कोणी काढले हे लवकर समजत नाहीत. त्यामुळे अनेक लाभार्थी हे सतत संजय गांधी समिती मध्ये संपर्क करतात व त्यांची ससेहोलपट होते, तसेच पोस्टात खाते उघडताना संजय गांधी कार्यालयामधील मंजुरी पत्र घेतले जात नाही. त्यामुळे सदर कार्यालयाचे लाभार्थी नेमके कोण आहेत हे समजून येत नाही. अनेक वेळा खाते क्रमांक बरोबर असताना देखील छ- असा शेरा देवून लाभाथ्यर्थ्यांची यादी परत का पाठवतात, असा प्रश्न आपण केल्याचे अनिल डाळ्या यांनी सांगितले

पोस्टातील रक्कम मोबाईल ॲप वरून उचलता येते. इकडील कार्यालयात वृद्ध लाभार्थी आहेत. त्यांचे नातेवाईकांचा मोबाईल नंबर दिला जातो. ते नातेवाईक परस्पर रक्कम उचलतात सदर लाभार्थी यांना अनुदान मिळत नाही, असे लाभार्थी रोज कार्यालयात येतात. पोस्टाचे स्टेटमेंट घेतले असता अनुदान उचलल्याची नोंद असते. पण लाभार्थ्यांना ती मिळालेली नसते. त्यामुळे लाभार्थ्यांना व कार्यालयीन कर्मचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो, संजय गांधी कार्यालयात एक दोन महिन्यात मिटींग होत असतात व नवीन लाभार्थी मंजूर होतात. त्यामुळे लाभार्थी संख्येत वाढ होते, जर प्रत्येक महिन्याचे अनुदान शासनाकडून येत असते त्यामुळे जर प्रत्येक बिलात वरील अडचणी सतत निर्माण झालेस कार्यालयीन कामकाज करणेस अडचणीचे होत आहे. पोस्टाचे कोणतेही पाठविलेली रक्कम परत लेखी स्वरूपात नसलेने वारंवार आलेल्या रक्कमांचा ताळमेळ / कॅशबुक लिहिणेस अडचणी निर्माण होत आहेत. इचलकरंजी संजय गांधी कार्यालयात १ लिपिक व १ अव्वल कारकून रिक्त असलेने व अपूरे मनुष्यबळ आहे. व कार्यालयात एकूण ३०,००० चे वरती लाभर्थी असलेने कामकाज करताना अडचणी निर्माण होत आहेत. या सर्व समस्या पोस्ट अधिकाऱ्यांच्या निदर्शनास समितीने आणून दिले. यावेळी समिती सदस्य कोंडीबा दवडते, सुखदेव म्हाळकर, महेश ठोके, तमन्ना कोटगी, संजय नागुरे, जयप्रकाश भगत, महेश पाटील, सलीम मुजावर, सौ. सरिता आवळे आदी उपस्थित होते.असेही शेवटी डाळ्या यांनी पत्रकारांना सांगितले

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे





## क्रीडा भारती अंबाजोगाईची कार्यकारिणी घोषित

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

क्रीडा भारती अंबाजोगाई तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून तालुका अध्यक्षपदी शैलेश कुलकर्णी तर मंत्रीपदी ज्ञानेश मातेकर यांची निवड करण्यात आली. क्रीडा भारतीचे देवगिरी प्रांत मंत्री भिकाजी बारसे यांच्या प्रमुख उपस्थितीत नुतन कार्यकारी निवडण्यात आली.त्यात तालुका अध्यक्षपदी शैलेश कुलकर्णी, तालुका मंत्री ज्ञानेश मातेकर, उपाध्यक्ष सौ.मंदाकिनी गित्ते,प्रा.दिलीप कांबळे,सहमंत्री संजय वाकडे,योग प्रमुख प्रा.दिपक देवळे, सहप्रमुख उत्रेश्वर पांचाळ गुरुजी,युवा प्रतिनिधी बालाजी कराड,युवती प्रमुख कु.साक्षी थाटकर, क्रीडा केंद्र प्रमुख शारदा प्रसाद साहू सर, मनोज देशमुख सर,मातृशक्ती प्रमुख डॉ.रिता रामावत.तर जिल्हा योग सहप्रमुख प्राचार्य डॉ.दामोदर थोरात सर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

याप्रसंगी बोलतांना प्रांत मंत्री भिकाजी बारसे म्हणाले की, स्वदेशी खेळांच्या प्रसार होणे आवश्यक आहे.क्रीडा भारती च्या माध्यमातून शालेय व महाविद्यालयीन खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.मोबाईल व टि.व्ही च्या अती वापरामुळे तरुणाई मैदानापासून दुरावत चालली आहे.पालकांनी सुध्दा याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

जिल्हा मंत्री विनायक वझे म्हणाले की, आगामी काळात क्रीडा भारतीचे जिल्हा संमेलन होणार आहेत.योग प्रसार हा काळाची गरज आहे.रथसप्तमी निमित्ताने तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालातुन सूर्यनमस्कार प्रात्यक्षिके आयोजित करण्यात यावीत. असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेश कुलकर्णी, सुत्रसंचलन, ज्ञानेश मातेकर, आभार प्रदर्शन सौ.मंदाकिनी गित्ते यांनी केले. याप्रसंगी बिपिन दादा क्षिरसागर, राकेश मोरे, भास्कर थाटकर,सह क्रीडा भारतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## भाजपाने १० वर्षात केलेली सर्व कामे जनतेपर्यंत पोहोचवावी- आ. सुरेश धस




पाटोदा । आजीज शेख

गेल्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपा सरकारने गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण अंतर्गत सुरक्षा, सांस्कृतिक उन्नती आणि जगामध्ये भारताचा गौरव वाढविण्यासह विकासाच्या सर्व आयामांवर अतुलनीय कार्य केले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाची विकासाची दृष्टी गरीबांच्या कल्याणाकडे घेऊन आणि सरकारने केलेली विकासकामे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या निर्देशानुसार गाव चलो अभियान सुरू करण्यात आले आहे. भाजपाने १० वर्षात केलेली सर्व कामे जनतेपर्यंत पोहचावे असे आवाहन आ. सुरेश धस यांनी केले.पाटोदा तालुक्यातील गारमाथा येथे भाजपाचे गाव चलो अभियानच्या अनुषांगाने प्रमुख कार्यकत्यांच्या आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी पुढेबोलतांना आ.धस म्हणाले, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाची विकासाची दृष्टी गरीबांच्या कल्याणाकडे घेऊन आणि सरकारने केलेली विकासकामे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून

त्याचबरोबर ८ फेब्रुवारी रोजी कार्यशाळा आयोजित करून अभियानाबाबत नियोजन करण्यात आले असल्याचे पाटोद्यात भाजप कार्यशाळेचा समारोप जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या निर्देशानुसार गाव चलो अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानातंर्गत देशभरातील सात लाख बूथवर कार्यकर्ते २४ तास कार्यरत राहणार आहेत. आ. धस यांनी सांगीतले. सर्वोच्च नेतृत्वाच्या सूचनेनुसार ४ ते ११ फेब्रुवारी दरम्यान गाव चलो अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानादरम्यान भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते २४ तास बूथस्तरावरील बैठकीपासून ते घरोघरी जाऊन लोकांशी संवाद साधतील. त्याद्वारे सरकारच्या योजनांची माहिती देखील नागरिकांना देतील. त्यानुसार, प्रत्येकाने जबाबदारी पार पाडावी असेही भाजपाने १० वर्षात केलेली सर्व कामे जनतेपर्यंत आ. सुरेश धस म्हणाले.



जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथे सांस्कृतिक, विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पारंपरिक दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक संचालक मा. श्री. निंबाळकर साहेब वित्त व लेखा विभाग समाज कल्याण विभाग छत्रपती संभाजी नगर, मा.श्री. डहाळे साहेब,लेखा अधिकारी समाज कल्याण विभाग छत्रपती संभाजीनगर, तसेच समाज कल्याण विभाग छत्रपती संभाजी नगर येथील लिपिक मा. श्री. मनोज बोहरा तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.डॉ. सदाशिव सरकटे हे उपस्थित होते.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी प्रमुख पाहुणे मा. श्री. निंबाळकर साहेब यांनी असे असे प्रतिपादन केले की की, सध्या आपल्याकडे आधुनिकतेच्या नावाखाली आपण आपली संस्कृती विसरत चाललो आहोत. या लोप पावत असलेल्या भारतीय संस्कृतीला पुन्हा नव्याने जिवंत करण्यासाठी हा पारंपरिक दिवस अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. राष्ट्रीय एकात्मिकता टिकवण्यासाठी अशा कार्यक्रमाची आवश्यकता आहे. विविध धर्म, जात, प्रांत त्यांच्या प्रथा, परंपरा, वेशभूषा इ. ची माहिती या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना होते. त्यांच्यामध्ये एकमेकांच्या धर्माप्रती आदरभाव, विविधतेतुन एकता,सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन इ गुणांची जोपासना केली जाते. यावेळी मा.मा. श्री. डहाळे व मा. श्री. मनोज बोहरा यांनीदेखील आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. डॉ. सदाशिव सरकटे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांसमोर पारंपरिक दिवस साजरा करण्यामागील भूमिका विशद केली. व विद्यार्थ्यांनी यासाठी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले व

## इयत्ता दहावी व बारावी परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी

गेवराई (दै.मराठवाडा दर्शन)

माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा माहे फेब्रुवारी, मार्च, २०२४ मध्ये होत असून परीक्षेमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी, परीक्षा कॉपीमुक्त करण्याकरिता तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी दिपा मूधोळ-मुंढे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात दि. २१ फेब्रुवारी, २०२४ ते २६ मार्च, २०२४ या कालावधीत परिक्षेच्या वेळेच्या १ तास आगोदर ते परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरात व परिक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी मनाई आदेश जारी केले आहे. परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असतांना परीक्ष न देणारे विद्यार्थी आणि इतर काही घटक परिक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षा चालू असतांना उपद्रव करित असतात. परिक्षा चालू असतांना कॉपी देण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेराक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दूरूपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता परिक्षा देणा-या विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी ,कर्मचारी यांना बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये इयत्ता १२ व दहावीच्या परिक्षा केंद्राच्या ठिकाणी व परिक्षा केंद्राच्या २०० मिटर परिसरात फौज्दारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) करण्यात आले आहे.या परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी केला असून परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरापर्यंत शासकीय कर्तव्ये पार पाडणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी यांच्या व्यवतिरिक्त दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास, फोटोकॉपी, ई-मेल, इंटरनेट सुविधा, इतर दळणवळण, संदेश वहन साधने तसेच कोणत्याही व्यक्तीजवळ मोबाईल, वायरलेस सेट, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप, संगणक बाळगण्यास, एस.टी.डी,आय.एस.डी मशिन, ध्वनीक्षेपक वाजविण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. शासकीय परिक्षेसंबधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या २०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम, मयताची अंत्ययात्रासाठी लागु राहणार नाही.




### पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर हे रुजू होताच त्यांनी गेवराई शहर व हद्दीत

## गुन्हेगारीवर लगाम घालण्याचे संकेत रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या दुकानदारांना कडक इशारा

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई पोलीस ठाणेतर्गंत शहर व गाव हद्दीत पुर्वी खुलेआम अवैध धंद्यांना तत्कालीन पोलीस निरीक्षकांनी अर्थपुर्ण व्यवहारारामुळे खुलेआम सुट दिल्याने गेवराईत व हद्दीत गुन्हेगारीचा आलेख झपाट्याने यामुळे वाढत होता.आता गेवराई पोलीस स्टेशनला नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर हे रुजू होताच त्यांनी गेवराई शहर व हद्दीत गुन्हेगारीवर लगाम घालण्याचे संकेत देत आता गुन्हेगारी मोडीत काढणार आसल्याचे सांगितले. रात्री उशिरा पर्यंत शहरासह ठाणेतर्गंत चालणा-या दुकानदारांविरुध्द कडक कारवाई करणार आसल्याचे सांगत या ठाणे हद्दीतील गोदावरी नदी पात्रातून ज्या गावामधून अवैध ऋवाळू उपसा व चोरी करणा-या विरोधात धडक मोहीम राबविण्यात येऊन या वाळू चोरीवर देखील लगाम घालत वाळू चोरी करणाऱ्या विरोधात कडक कारवाई करण्याचे पाऊले उचली जातील असे नवनिर्वाचित गेवराईचे पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. दरम्यान त्यांची आता सुरु होणारी दबंग कारवाईमुळे पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या अवैध धंद्यावाल्यांच्या तंबूत घबराट निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.



गेवराई पोलीस ठाण्याचे पुर्वीचे पो. नि. धनंजय फराटे यांच्या कार्यकाळात खुलेआम व राजरोसपणे गेवराई ठाणेतर्गंत अर्थपुर्ण व्यवहार करुन अवैध धंद्यानी हौदोस घालत गुन्हेगारीचे प्रमाण अधिक वाढत गेले.रात्री अपरात्री गोदावरी नदी पात्रातून चोरी होणारी वाळू त्यांच्या काळात खुलेआम दिवसा देखील सुरु झाली होती. दरम्यान आता गेवराई पोलीस स्टेशनला खमक्या आधिकारी आला असुन पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांनी नुकताच पदभार घेत प्रथमता त्यांनी गेवराई पोलीस ठाणेतर्गंत असलेल्या गुन्हेगारीवर लगाम घालण्यासाठी उपाय योजना आता आखल्या आहेत.पहिल्याच इंन्ट्रीत त्यांनी पाडळसिंगी येथील कुंटणखाण्यावर छापा मारत बाहेर जिल्ह्यातील पाच महिला सुटका करत तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.या त्यांच्या पहिल्याच इंन्ट्रीत गेवराईतील अवैध धंदे चालविणारे व विशेषता वाळू चोरी करणा-या माफियांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. आता त्यांनी गेवराई हद्दीतील गुन्हेगारी व अवैध वाळू चोरीवर लगाम घालण्यासाठी उपाय योजना आखल्या असुन रात्री उशिरापर्यंत चालणा-या हॉटेल धारकाविरुध्द कडक कारवाया करण्याच्या सुचना आपल्या कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. शिवाय सर्वात जास्त वाळू उपस्यापायी गोदावरी नदी पात्रातून गुन्हेगारी वाढत असुन अशा ठिकाणी स्वत: जाऊन वाळू माफियांविरुध्द कडक कारवाया करण्याचा इशारा माफियांना प्रविणकुमार बांगर यांनी दिला आहे.तसेच शहरातील बेशिस्त वाहतुक, दुचाकी, चारचाकी, पॉकिटमार,महिलांच्या गळ्यातील सोनं, मोबाइल चोर, भुरट्या व अन्य घरफोड्या करणाऱ्या चोरांविरुध्द लगाम घालण्यासाठी रात्रीची गस्त वाढविणे व दिवसभर व्यापारपेठत संशयितित्या फिरणाऱ्या विरुद्ध सध्या गणवेषातील पोलीसांची नजर ठेवून त्यांचा बंदोबस्त करणार आहेत. एकदंर पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांनी गेवराईतील गुन्हेगारीवर लगाम व पोलीसांची वचक बसविण्यासाठी उपाय योजना केल्याने आता नक्कीच अवैध धंद्यावाल्यांचे धाबे दणाणार असुन येणाऱ्या काळात त्यांच्या तंबूत घबराट होणार आसल्याचे यावरुन दिसन येत आहे.



कडा - येथील जि.प.कें.प्रा.कडा नं.१ शाळेच्या शिक्षिका श्रीमती अरूणा वसंतराव पवार - राऊत यांच्या सेवापुर्ती सत्कार समारंभ प्रसंगी उपस्थित राहुन शुभेच्छा देतांना माजी विद्यार्थी तथा पत्रकार रहेमान सय्यद,पत्रकार अनिल मोरे, पत्रकार संदिप जाधव दिसत आहेत.



अँड संगीता ताई चव्हाण शिवसेना महिला जिल्हाप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य महिला आयोग सदस्य यांना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा देताना सामाजिक कार्यकर्ते अशोक दादा ढोले पाटील व प्रकाश तावरे

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com